जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ६४४ दिनांक - २५/०८/२०२३**

चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## मंगळसुत्र चोरी करून,सांगली शिराळा तालुका येथे पसार झालेल्या आरोपीस ठोकल्या बेडया

दिनांक १७/०८/२०२३ रोजी तक्रारदार महिला ह्या मथुरा हौसींग सोसायटीचे जवळ,हायफाय फॅशन कपडयाचे दुकानासमोर,संघर्ष चौक,चंदननगर पुणे येथे फिर्यादी व त्यांचे सोबत इतर तीन महिला,कपडे घेणेसाठी पायी चालत जात असताना, त्यांचे समोरून लाल काळया रंगाचे मोटार सायकल वरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने हिसका मारून,तोडून जबरीने चोरी करून पळुन गेले बाबत तक्रारदार यांनी तक्रार दिल्याने चंदननगर पोलीस स्टेशन गुन्हा रजिनं.३८९/२०२३, भादवि कलम ३९२,३४ अन्वये गुन्हा नोंद करणेत आलेला आहे.

चंदननगर पोलीस स्टेशनचे तपास पथक व प्रभारी अधिकारी व अंमलदार हे दाखल गुन्हयातील आरोपींचा गोपनीय बातमीदार व तांत्रीक विश्लेषणाचे आधारे अधिक तपास करून शोध घेत असताना, **आरोपी १)ओंकार रामकिसन गायकवाड,वय-२० वर्षे,रा.एल.एन.टी फाटा,चाकण रोड,शिक्रापुर पुणे** हा अपराध केल्या पासुन पसार झाले असल्याचे व तो सांगली जिल्हयात शिराळा तालुक्यात असल्याची गोपनीय बातमी मिळाल्यावरून,त्यास दिनांक २३/०८/२०२३ रोजी शिराळा तालुका,जिल्हा सांगली येथुन ताब्यात घेवुन,अटक करणेत आलेली आहे.

ओंकार गायकवाड व त्याचा साथीदार यांनी मंगळसुत्र जबरीने चोरी करतेवेळी वापरलेली सुमारे २ लाख रूपये किंमतीची बजाज डॉमीनोर ४०० सीसी गाडी एमएच-०१/सीझेड २५९७ ही त्याचेकडून जप्त करणेत आलेली असून दाखल गुन्हयाचा अधिक तपास चालु आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ४ श्री.शशिंकात बोराटे,मा.सहा.पोलीस आयुक्त, येरवडा विभाग श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र लांडगे, चंदननगर पो.स्टे.पुणे शहर,श्रीमती मनिषा पाटील,पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथक प्रभारी अधिकारी पो.उप-निरी अरविंद कुमरे,पोलीस अंमलदार अविनाश संकपाळ,अस्लम अत्तार,सचिन रणदिवे,सुहास निगडे, महेश नाणेकर,शिवाजी धांडे,श्रीकांत शेंडे,नामदेव गडदरे,सुभाष आव्हाड,विकास कदम,शेखर शिंदे,श्रीकांत कोद्रे, सुरज जाधव,गणेश हांडगर यांनी केली आहे.